417

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा / सप्रा ३/झोपुआ/११८६२/२०२२
दिनांक : ३० /०८/२०२२

## झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम अधिसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे उक्त अधिनियम असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि. ३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. गोयल गंगा प्रमोटर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे;

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी दि.३१/०१/२०२२ रोजी झोपडपट्टी घोषित करण्याची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र फेब्रुवारी १०-१६, २०२२ पृष्ठ क्र. १३ व १४ वर तसेच महाराष्ट्र टाईमस व दैनिक समाचार या वृत्तपत्रात दि.११/०२/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आली आहे. तसेच, सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.११/०२/२०२२ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, सदरच्या प्राथमिक पुर्वसुचनेच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पिंपरी चिंचवड पुणे यांनी या कर्यालयाकडे दि.०८/०२/२०२२ रोजी हरकत दाखल केली होती. तथापि, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) (सुधारणा), २०१८ मधील कलम ३ क च्या पोटकलम १ च्या तरतूदीमध्ये *" कोणतीही झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रसिद्ध झाल्यानंतर यथाशीघ्र, मुख्य कार्यकारी अधिकारी, कोणत्याही जमिनीच्या बाबतीत, मग ती पुर्वी झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित झालेली असो किंवा नसो, व ज्यात सामूहिक आर्थिक कार्यक्षेत्राचा अंतर्भाव करता येईल ती जमीन, झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केले जाणे समर्थनीय ठरविणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यावर, कोणतीही सार्वजनिक प्राधिकरणे किंवा राज्य विधानमंडळाने अधिनियमित केलेल्या कोणत्याही कायद्यान्वये घटित केलेल्या राज्य शासनाच्या स्थानिक संस्था यांसह जमीन मालकांना तीस दिवासांची नोटीस आणि त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे आणि त्यानंतर पंचेचाळीस दिवसांच्या आत अशी जमीन "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून घोषित करील. झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणा-या आदेशास (यात यापुढे ज्याचा निर्देश "झोपडपट्टी पुनर्वसन आदेश" असा करण्यात आला आहे) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिका-याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने व्यापक प्रमाणात प्रसिद्धी देखील करण्यात येईल. त्यानंतर, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भुत असले तरी, अशा झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रात जमीन मालकी प्राधिकरणाची किंवा अभिकरणाची परवानगी किंवा ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता असणार नाही."* असे नमूद केले आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पिंपरी चिंचवड पुणे यांची दि.०८/०२/२०२२ रोजीची हरकत दि.२८/०९/२०२२ रोजी निकाली काढण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दाखल करणेत आलेल्या सदरच्या प्रस्तावाच्या मिळकतीचे मालकी हक्क सुस्पष्ट होणे कामी मालकी हक्काबाबतचा सुस्पष्ट अभिप्राय नगरभूमापन कार्यालय, पिंपरी, पुणे यांचेकडून दि.२३/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मागविणेत आलेला होता. अद्याप संबंधित कार्यालयाकडून कोणताही अभिप्राय अथवा खुलासा प्राप्त झालेला नसल्याने या मिळकतीच्या मालकी हक्काबाबत भविष्यातील दावा हरकतीस अधिन राहून सदर आदेश निर्गमित करणेत येत आहे.

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) मधील नमूद तरतूदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सदरचा झोपडपट्टी पुनर्वसन आदेश कायम करून खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करीत आहे; सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३क (२) मधील तरतूदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, चौथा मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई - ४०००५१ येथे अपील दाखल करता येईल आणि अशा अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

**झोपडपट्टीचे नाव** :- स.नं. १४१ पै, १५१ पै, स.नं.३६ पै, सि.स.नं.५९९३पै, ५९९६पै, ५९९९पै ६०००पै, ६००१पै व ६००६पै लालटोपीनगर, मोरवाडी, पिंपरी पुणे.

**महानगरपालिकेचे नाव** :- पिंपरी - चिंचवड महानगरपालिका.

अनुसूची

| गाव | स.नं./ सि.स.नं. /फा.प्लॉ.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (मोजणी नकाशा नुसार त्रिमितीय पद्धतीने येणारे क्षेत्र) | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| मौजे मोरवाडी पिंपरी | स.नं.१४१पै,१५१पै, स.नं.३६पै,सि.स.नं .५९९३पै,५९९६पै, ५९९९पै,६०००पै, ६००१पै व ६००६पै | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व पिंपरी चिंचवड म.न.पा. | २३७४८.२५ चौ.मी. | **पुर्वेस** - लागू नाला<br>**पश्चिमेस** - लागू रस्ता<br>**दक्षिणेस** - स.नं१५१पै व सि.स.नं.५९९३पै, ५९९६पै,५९९९पै, ६०००पै<br>**उत्तरेस** - लागू स.नं.१४१पै, स.न.३६पै, सि स.नं.६००१पै, ६००६पै | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- २९ /०८ /२०२२.

29.9.22

(राजेंद्र निंबाळकर), (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :-

१. प्रादेशिक अधिकारी क्र.१, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, टेल्कोरोड, अन्नासाहेब नगर रोड, पिंपरी चिंचवड पुणे १९- यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव सादर.
२. मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका - यांना माहितीस्तव.
३. व्यवस्थापक मुद्रणालय,येरवडा कारागृह, पुणे -६ .